REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 7 | APRIL - 2020

# महात्मा गांधी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न : एक अभ्यास

डॉ. लदाफ एस.के.
इतिहास विभाग,आझाद महाविद्यालय,
औसा ता. औसा जि. लातूर.

**प्रस्तावना :**

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी स्वयंपूर्ण खेडे, गांव हा अर्थ व्यवस्थेचा मूलभूत असा पाया होतो. क्ष्या काळात सरंजामदार हा कांही विशिष्ट गावातील महसूल निश्चित करणे आणि तो वसूल करणे असे दुहेरी स्वरुपाचे कार्य करीत होता. त्याला, राजाला अथवा शासन व्यवस्थेला कांही ठरावीक प्रमाणात महसुल गोळा करुन देण्याचा हक्क प्राप्त झाला होता. प्राचीन काळापासून अनेक राजवटी होऊन गेल्या असल्या तरी खेड्यातील समाजाला जमिनीपासुन दूर ठेवण्याचा प्रयत्न झाला नाही. राजा किंवा शासन संस्था यांना जमिनीच्या उत्पन्नातील कांही भाग गोळा करण्याचा अधिकार होता. तसेच व्यक्तिगत शेतकरी हा जमिनीचा मालक कधीही नव्हता. याचा अर्थ य काळात जमिनीची खाजगी मालकी अस्तित्वात होती असे म्हणता येणार नाही. ब्रिटीशांच्या काळात जमीनदार आणि व्यक्तिगत शेतीचा मालक असे शेतकऱ्यांचे दोन वर्ग निर्माण केले होते. ब्रिटीशांच्या धोरणामुळे शेती व्यवस्थेत नव्या पर्वास प्रारंभ झाला जमिनीची मालकी वैयक्तिक होऊन जमीन बाजारातील विक्रीची वस्तू बनली. परिणाम पूर्वीच्या स्वयंपूर्ण खेडेगावातील शेती विषयक व आर्थिक कार्यो नाहीशी झाली. त्याच बरोबर सहकार्य आणि समुदायिक जीवनाचा ऱ्हास झाला. स्वयंपूर्ण खेडेगावातील शेतकरी नाहीसा झाला. आणि ब्रिटीश भांडवलाच्या आणि वाढत्या उद्योगाच्या गरजांना कच्चा माल पुरविणारा असे स्वरुप त्यास प्राप्त झाले. त्यामुळे शेतीचे उत्पादन` राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा एक भाग झाले. शेतीचे हे प्रश्न राष्ट्रीय स्तरावर चर्चिले जाऊ लागले. वसाहतीत अर्जव्यवस्थेचे सर्व फायदे-तोटे त्यात दिसु लागले. शेतीचा प्रश्न औद्योगिक विकासासाठी संबंधीत असा बनला. ब्रिटीश काळात शेतीबाबत कांही मुलगावी स्वरुपाचे प्रश्न दिसुन आले. या काळात आर्थिक प्रगतीचे इतर मार्ग उपलब्ध न झाल्याने शेतीवर पोट भरणाऱ्यांची संख्या भरमसाठ प्रमाणात वाढली. शेतकऱ्यांची संख्या बेसुमार वाढली असली तरी शेतीच्या मशागतीसाठी उपयोगात आणलेली साधने तांत्रिक दृष्ट्या मागासलेली ठरली. शेतीच्या व्यवसायाचा झपाट्याने ऱ्हास होऊ लागला त्यामुळे शेतकऱ्यांचे दारिद्रय दिवसेदिवस वाढु लागले. शेतकऱ्यांची सतत वाढू लागल्याने जमिनीचे लहान लहान तुकडे पडले. शिवाय शेतकऱ्यांचे रुपांतर शेतमजूरात होऊ लागले. पुढील काळात शेतमजुरांची संख्या सतत वाढू लागली. शेतीमध्येही भांडवलशाही उत्पादनाच्या द्रष्टीने आवश्यक अशी भूमिका तयार झाली. मोठ्या जमिनदारांच्या ताब्यात असणाऱ्या जमिनीचे प्रमाण अधिक प्रमाणात वाढु लागले. याच्या उलट छोटाशेतकरी आर्थिक प्रश्नात सापडला असल्याने त्याला आपल्या मालकीच्या जमिनी ताब्यात ठेवणे कठीण झाले. त्यामुळे छोटा शेतकरी हा शेतमजूर झाला.गेल्या शतकापासुन सरकारच्या महसुल वाढीच्या धोरणामुळे शेतकरी वर्ग अडचणीत आला. या काळात ९५% पेक्षा अधिक लोक शेतीवर अवलंबुन होते. ब्रिटीश सरकार प्रत्येक ३० वर्षाची फेरतपासणी करुन शेत महसुल वाढवीत असे. कोणतेही नैसर्गिक संकट आले तरीही शेतकऱ्यास निश्चित केलेल्या तारखेस महसुल भरावा लागत असे. महसुलासाठी पैसे नसल्यास गुरे-धोरे दागिने अथवा घर गहान ठेवुन महसुल भरावे लागत असे. त्यामुळे वर्षभर पोट कसे भरावे असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण होत असे. कर्जाचा बोजा सतत वाढतच होता. त्याची परतफेड करणे आवाक्याच्या भाहेरचे झाले होते. त्याचा परिणाम त्याला भिषण दारिद्र्यास तोंड द्यावे लागे. स्वतःचे पोट भरणे कठीण झालयाने शेतीचा विकास घटवुन आणणे शक्य झाले नाही.



त्यामुळे जमिनीचा कस कमी होत गेला. अशा परिस्थितीत दुष्काळाने त्यास पिळवुन काढले. म्हणुन असहाय्य बनलेल्या शेतकरी वर्गाने दक्षिणेत बंद केले. शेतकऱ्यांची परिस्थिती हलाखीची बनल्यास सरकार जबाबदार नसुन सावकार कारणीभुत आहे. असे स्पष्ट करुन सरकारने कायदा केला. इ.स. १८७९ च्या कायद्या प्रमाणे कुळाची जमिन सवकारांस विकाणे, चक्रवाढ व्याज घेणे , बैल अवजारे वगैरे वर जप्ती आणणे या गोष्टी बंद केल्या शेतकऱ्यांच्या असंतोषाची कारणे दारिद्रय कुटूंबवाढ, दुसरा व्यवसाय नसणे, निकृष्ट होत असलेल्या जमिनी, पावसाचा अनिश्चितपणा असे असेले तरी सरकारचे धोरण हे प्रामुख्याने कारणीभुत भरले. शेतकऱ्यांच्या दारिद्रयाच्या कारणापैकी महसुल वाढ हे महत्त्वाचे कारण होते. मात्र सरकारणे सोयीस्कररित्या दुर्लक्ष केले होते. परंतू वाढीव महसुल शेतकऱ्यांना संकटात आणत होते. याची सरकारला जाणीव झाल्यानंतर इ.स. १८७९ व १८८४ मध्ये महसुल वाढीवर मार्यादा घालण्यात आल्या. प्रत्यक्षात महसुल वाढ करताना निरनिराळ्या युक्त्या योजनु तो वाढविला जाई. विशेष म्हणजे शेतकऱ्यांच्या दारिद्रयाच्या अनेक कारणांपैकी महसुलवाढी हे एक कारण आहे. असेस्पष्ट होऊन ही सातत्याने अप्रत्यक्षरीतीने का होईना महसुल वाढ केल्याचे दिसते. या विषयी रमेशचंद्र दद्वत्त्ङ्क म्हणतात, जमिनीच्या लागवढीची वाढ १० टक्के झाली, तर महसूल शेकडा १२ टक्केने वाढला राष्ट्रीय काँग्रेसने सुरुवातीपासून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिक पणे प्रयत्न केल्याचे दिसते. खेड्या मोठ्या संख्येने लोक शेती करत असल्याने गांधीजींने त्यांच्या प्रश्नांबाबत व्यापक प्रमाणात चर्चा केल्याचे आढळते महात्मा गांधी म्हणतात ‘हळुहळु जमिन ओरखडून कसेबसे जगावे एवढीच उद्योगाची मर्यादा त्यांच्या बाबत पडत चाललेली आहे. हिंदुस्थानच्या लहान लहान आणि अशास्त्रीय पध्दतीच्या शेतजमिनीतील शेती ही लाभदायी नाही. हे फार थोड्यांना ठाऊक आहे. खेड्यातील शेतकरी निष्प्राण जीवन जगत असतात. त्यांचे जगणे म्हणजे मंदगतीने होणारी उपासमारी ची क्रिया आहे. त्यांच्यावर कर्जाचा बोजा असतो सावकार त्यांना कर्ज देतो कारण त्यांना दुसरे कांही करणे शक्यच नसते. तो जर देणार नाही तर, सारेच त्याला गमवावे लागेल. खेड्यातील या कर्जपध्दतीचा अभ्यास करतात माणुस घोटाळ्यात पडतो. कितीही बारीक सारीक तपशील शोधण्याचा प्राणिकपणे प्रयत्न केला असला तरी त्या संबंधीचे आपले ज्ञान वरवरचे राहते’. महात्मा गांधीजींने अत्यंत मोजक्या शब्दांत वरील प्रमाणे भारतातील शेती आणि शेतकऱ्यांची परिस्थिती याचे वर्णण केले आहे. शिवाय तो सावकारांच्या ताब्यात कसा अडकला आहे. आणि त्यामधुन त्याची सुटका होणे कसे अशक्य आहे याचे अत्यंत समर्थरीतीने विश्लेषण केले आहे. ग्रामीण भागात संयुक्त कुटूंब पध्दती आढळुन येते या पध्दतीमुळे शेतीला दुरवरच्या आणित्वरीत असे सुसंघटित स्वरुप प्रापत करुन देणे कठीण असे आहे. शेतीचा आकाार दिवसेंदिवस कमी होत चाललेला आहे. त्यामुळे शेतीत कोणत्याही प्रकारची सुधारणा करण्याचा प्रयत्न केला तरी, जमिनीचे तुकडे करण्याची प्रथा आहे, तो पर्यंत निव्वळ शेतीही भारताचे दारिद्रय नाहीसे करण्यास उपयुक्त ठरणार नाही से गांधीजींना वाटते.१.

दुष्काळाचे संकट शेतकऱ्यांना सतत अडचणीत आणते दुष्काळ हे देवाचे देणे समजले जाते. हि चुकीची समजुत संपुष्टात आणली पाहिजे त्यासाठी दुष्काळ कापडतो त्याची कारण मीमांसा शेधण्याचा प्रतय शेतकऱ्यांकडुन झाला पाहिजे असे गांधीजींना वाटत होते तसेच गांधीजींनी असे सूचित केले आहे कि, साधनसामग्री भरपुर असणाऱ्या देशात दुष्काळापुढे दबुन नजाता त्याला खंबीरपणे तोंड दिले जाते. तशी शक्ती शेतकरी वर्गात निर्माण झाली पाहिजे. भारतात दुष्काळ हे केवळ पावसाच्या आावामुळे किंवा अंतिपावसामुळे पडत नाही, तर , पाऊस नसलेलया काळातुन बाहेर पडण्याची पुरेशी साधन सामग्रीच त्यांच्या जवळ नसते. क्ष्यामुळे त्यांची खरी ससेहोलपट होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सतत पडणाऱ्या दुष्काळाच्या संकटपासुन जनतेचे संरक्षण करण्याकरिता कोणत्याही प्रकाची उपययोजना ब्रिटीश शासनामार्फत होत नसल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केजी होती. या बाबत तयांनी द. आफ्रिकेचे उदाहरण दिले होते. जनता तोळधाडीशी अथवा दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीशी अत्यंत खंबीरपणे आणि योजकतेने सामना देत असल्याचे त्यांनी दाखवुन दिले होते. त्याच्या उलट आपल्या देशातील शेतकरी दुष्काळाचे कारण सरकारच्या माथी मारुन उपाय योजना करण्याबद्दल फारसे प्रयत्नशील नसतात म्हणून दुष्काळावर मात करण्यासाठी शेतकरी वर्ग जिद्दीने प्रभावी असे उपाय शेधत नसल्याबद्दल महात्मा गांधीजींने खेद दर्शविला होता.२

ब्रिटिशपूर्व काळात दुष्काळाचे संकट निर्माण झाले तरीही माणसांना कांही उद्योगधंदे करता येत होते. परंतु ब्रिटीशांच्या आर्थिक धोरणामुळे खेड्यातील हस्तोद्योग नष्ट झाले . त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पीकांच्या रुपाने जो पैसा मिळतो, तो त्यांच्या हातात राहत नाही. कारण महसूल अधिकारी आणि विदेशी माल यांनी त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा ताबा घेतला. विदेशी माला शिवाय कांही चालणार नाही, अशी त्यांना हेतुपुरस्सर जाणीव करुन देण्यात येत असते. पूर्वीच्या काळी राजे रजवाडे देखील जुलूम करीत असत. परंतु त्याचे परिणाम फारच घातक असे ठरत नसत. त्या जुलूमापासून सुटण्याचे कांही मार्ग् त्यांच्यापुढे होते. उदा. जुलूमी राजाच्या विरोधात उठाव करण्याचे जनतेला स्वातंत्र्य होते. शिवाय त्या काळात प्रजेस निःशस्त्र केले गेलेले नव्हते. किंववा त्यांचे खच्चीकरणही झाले नव्हते. त्याकाळी आर्थिक व राजकीय

परिस्थितीला तोंड देणे सोपे होते, मात्र ते ब्रिटीशांच्या काळात अवघड झाले. कारण त्यांनी आपणांस भ्यासड करुन सोडले असे गांधीजींचेस्पष्ट मत होते. ३

ब्रिटिशांनी स्वीकारलेले आर्थिक धोरण भांडवलशाहीचे पाळे मुळे मजबुत करणारे ठरले. त्यांच्या आर्थिक धोरणामुळे भारताचे संपूर्ण आर्थिक जीवनच बदलून गेले. खेडे हे केंद्रबिंदू न राहता शहर हे केंद्रबिंदू बनले. खेड्याला त्यांच्या अधिकारपदावरुन जुलमाने खेचण्यात आले असून त्याला शहराचा एक गलिच्छ व दारीद्री भाग बनविले. त्याच बरोबर त्याला शहरापासून दूरवर ठैवण्यात आले. या एकांगी अर्थरचनेच्या गरजा पुरवण्याकरीता आजची शिक्षण पध्दती आखण्यात आल्याचे त्यांनी म्हटले होते. शेतकरी कसा सुखी होईल ? या विषयी गांधीजी म्हणतात ''गांधीजी म्हणतात शेतकरी त्याच्या झोपडीत राहुनच पुन्हा सजीव तेव्हाच होऊ शकेल जेव्हा त्याला त्याच्या हस्तोद्योग परत मिळेल आणि आज जे त्यांच्या जीवनाविषयक गोष्टीकरिता शहरांवर अवलंबुल रहावे लागते. तसे रहावे न लागता खेड्यतच त्यांच्या गरजा भागतील'' म्हणजेच महात्माजींना ग्रामीण जीवनातुन लुप्त झालेल्या हस्तोद्योगाचे पुन्नरुजीवन केल्यावरुन खेड्याची पुनर्रचना करणे शक्त होणार नाही असे गांधीजींना खात्रीपुर्वक वाटत होते.४

ब्रिटीशांच्या महसूल पध्दतीवरही गांधजींनी आपले विचार मांडले आहे. सरकारच्या एकुण उत्पन्नातील मोठा भाग महसुलाद्वारे गोळा होत असतो. परंतु या महसुलाचा शेतकऱ्यांवर फार मोठा बोजा पडत असल्याचे त्यांनी दाखवुन दिले . मवाळ आणि जहाल कालखंडात अनेक नेत्यांनी कायमधारा पध्दतीची तरफदारी कैलयाचे दिसते. परंतु महात्माजींना ही पध्दती तितकीशी उपयुक्त वाटत नव्हती असे दिसते. या विषयी म्हणतात. ''कायमधारा पध्दतीचा गौरव पुष्कळच होतो पण तीचा ही फायदा मूठभर श्रीमंत जमीनदारांना होतो,रयतेला नव्हे, रयत सदैव निराधार राहिली आहे. शेतकरी हा केवळ मालकाच्या इच्छेवर कुळ म्हणुन जगतो म्हणुन केवळ शेतमहसुल खुप कमी करुन चालणार नाही. तर महसूल पध्दती सुधारली पाहिजे आणि रयतचे कल्याणही प्रधान गोष्ट मानली गेली पाहिजे परंतु त्या शेतकऱ्याला चिरडुन निष्प्राण करुन टाकण्याचा हेतू ब्रिटीश राज्य पध्दतीचा आहे असे दिसते.'' महात्माजीने सरकारी शेतीचे जोरदार पणे समर्थन केल्याचे आढळते. या बाबत ते म्हणतात.

'' माझे असे दृढ मत आहे की, आपण जोवर सरकारी शेती करीत नाही तोवर शेती धंद्याचा संपुर्ण लाभ आपल्याला मिळणार नाही. एक खेड्यातील १०० कुटूंबानी गावची जमीन १०० तुकड्यात कशीतरी विभागुन स्वतंत्र पणे शेती करण्यापेक्षा सर्वांनी सामूहित रीतीने शेती करणे हे अधिक हिताचे आहे हे बुध्दीला पटण्याजोगे नाही काय .''5

अधिक धान्याच्या उत्पादनासाठी गांधीजींनी सेंद्रीय खतांना अधिक प्राधान्य दिले होते. गांधजींना भारताच्या सर्व सामान्य जनतेचे आनंदाने सहकार्य मिळाले तर देशातुन अन्नटंचाईचे संकट टळेल, इतकेच नव्हे तर, भारताला गर्जे पेक्षा अधिक धान्याची प्राप्ती होईल. अशी खात्री वाटत होती, त्यांनी स्पष्ट केले की, सेंद्रीय खतांनी जमीन बिन कसाची न होता उलट अधिक सुपी होते. दैनंदिन जीवनातील टाकाऊ ठरणारे पदार्थ योग्य रितीने कंपोस्ट खड्यात गाडले तर त्याचे अंत्यंत उपयुक्त असे खत जमिनीला मिळ शकते त्या द्वारे कोट्यावधी स्वरुपाचे बचत होऊ शकते आणि धान्याच्या व कडधान्याच्या एकुण उत्पन्नात लक्षणीय वाढ होण्यास मदत होऊ शकते. त्यासाठी शेतकऱ्यांनी विपुल प्रमाणात कंपोस्ट खत निर्मितीसाठी जाणीव पुर्वक प्रयत्न केले पाहिजेत. तसेच शेतकऱ्यांनी कशा पध्दतीने या प्रकारच्या खताची निर्मिती करावी या बाबत त्यांनी बरेच विवेचन केले होते. प्राचीन भारतात शेतकऱ्यांचे धन त्यांच्याकडे असलेल्या त्यांच्या गाईच्या संख्येवरुन मोजले जात असे. त्यांच्या जवळच्या सोन्या चांदीवर अवलंबून नव्हते. शेतीसाठी बैलाची अतिशय उपयुक्तता होती परंतू आजच्या काळात परिस्थितीत बदल झाल्याचे त्यांनी दाखवुन दिले. अलीकडील काळात संपत्तीची कल्पना बदलली आहे. ती आपण रुपये सोने इ. इत्यादी स्वरुपात मोजत असतो. परिणाम शेतकरी आपल्या जनावरांकडे पुर्वीच्या काळाप्रमाणे फारशे लक्ष देत नाही. चांगल्या जनावरांचा दिवसेंदिवस ऱ्हास होत असल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्ती केल्याचे दिसते. गांधीजी विशद करतात. की खेड्यात कोणाची जनावरे उत्तम आहेत. आणि त्याची निगा कोणत्या प्रकारे राखली जाते हे शोधले पाहिजे. एखादा शेतकरी आपली जनावरे योग्य रितीने ठेवत असेल तर त्याचे अनुकरण इतरांनी करणे गरजेचे आहे. शिवाय त्यांच्याकडे उत्कृष्ठ बैल आहेत. त्यांना बक्षिस दिले पाहिजेत अशी योजना प्रत्येक खेड्यात राबविली पाहिजेत असा अग्रह त्यानी केला होता. जनावरांच्या औषध उपचारासाठी विशेष काळजी घेणे अगत्याचे आहे त्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. अदर्श जनावरे नसतील तर आदर्श गांव आपल्याला निर्माण करता येणार नाही. असे त्याना खात्रीपुर्वक म्हणायचे होते.६

महात्माजींना आपल्याकडील शेती व्यवसायात अनेक त्रुटी आढळुन आल्या होत्या त्याबद्दल ते म्हणतात. 'जमिन आपल्याकडे आहे पण जमिन लावण्याची पध्दती न परवडणारी जमिन जमीन धरणक्षेत्रे आणि शेती करण्याच्या पध्दती यांच्यामुळे आपण ओझ्याच्या बैलाच्या पातळीला पोहोचलो आहोत. जमीन आपल्याला वर्षभर पुरेल इतके अन्न देत नाही.

जवळ जवळ सहा महिने आपण बेकार राहतो. म्हणुन आपण सतत काम केले पाहिजे. आणि कांही उत्पादक कामात आपला सर्व वेळ घालविला पाहिजे.' जमिनदार आणि भूमिहीन यांच्यात दुरावा निर्माण करणे इतकेसे योग्य ठरणार नाही असे गांधीजींचे महत्त्व होते. या दोन्ही वर्गात परस्परांविषयी आदर विशवास यांचे वातावरण प्रस्तापित झाले पाहिजेत. त्यामुळे वरिष्ठ वर्गात आणि बहुजन समाजात हिंसक संघर्ष होण्याची शक्यता राहणार नाही त्यांना वर्ग संघर्षाचा विचार मान्य होता असे दिसत नाही. कारण त्यांना कमीत-कमी प्रतीकार करायचा या धोरणाने चालणे हे अहींसेचे महत्त्वाचे अंग आहे. असे वाटत होते. या विषयी गांधीजी म्हणतात. 'ज्या क्षणी जमिन कसणाऱ्या वर्गाला स्वताच्या शक्तीची जाणीव होईल त्याच क्षणी जमिनदाराचे भुत गाडले जाईल शेतकरी जर म्हणाले कि आम्हाला आमच्या मुलांना चांगल्या रितीने अन्न कपडे आणि शिक्षण घेण्याला पुरेल इतके वेतन जरील आम्हाला तुम्ही दिले नाही तर बिचारा जमिनदार काय करील ? वस्तुतः राबणारा हाच तो जे उत्पन्न करतो त्यांचा मालक आहे हे राबणार जर हुशारीने एकवटले तर ते एक जबर अशी शक्ती होईल. या माझ्या विचारसरणीमुळे वर्ग संघर्षाची आवश्यकता मला वाटत नाही. जर तोमला अपरिहार्य वाटला असता तर त्यांचा प्रचार करण्याला आणि तो शिकविण्याला मी मागेल पुढे पाहिजे नसते.' देशातुन जमिनदाराचे उच्चाटन झाले पाहिजे हा विचार देखील त्यांना मान्य नव्हता या विषयी त्यांचे मत पुढील प्रमाणे सांगता येईल. 'जो कसतो त्याची जमिन आहे हे मला मान्य आहे. परंतू त्याचा अर्थ जमीनदाराचा नाश केला पाहिजे असे करण्याचे कारण नाही जो मनुष्य बुध्दीचा, नाण्याचा पुरवठा करतो, जो हातांनी श्रम करतो. क्ष्यच्या इतकाच कसणारा आहे. या दोघांमध्ये आज जी भयंकर विषमता आहे ती काढुन टाकणे हे आम्हाला साधायचे आहे किंवा असले पाहिजे.' गांधीजींना जमिनीच्या मालकीबाबत विश्वस्तपणाची कल्पना मान्य असल्याचे दिसते परंतु त्यांना राज्यसत्येच्या नियंत्रणाखाली हवी होती म्हणजेच त्यांना जमिनदारवर्गाला आणि तसे म्हणटले तर कोणत्याच वर्गाला शत्रु म्हणुन त्यांचा उल्लेख करणे योग्य वाटत नव्हते, परंतु जमीनमालक सुज्ञपनाने वागले पाहिजे असे त्यांचे प्रामाणिक मत होते.७

भारताची लोकसंख्या वाढली आहे. आणि अधिलोकसंख्या की झाली पाहिजे. असे म्हणणे बाष्कळपणाचे आहे. असे गांधीजींना वाटत होते उपलब्ध असलेली सर्व जमिन योग्य रितीने उपयोगात आणली आणि तीचा जीतका मगदुर आहे. तितके पीक तिच्यातुन काढले तर संपूर्ण लोकसंख्येला चांगल्याप्रकारे जगविल. त्यासाठी सर्वांनी उद्योगी बनण्याचे आव्हान त्यानी केले होते. जेथे आज एक गवताची पाती उगवते तिथे कष्टामुळे दोन उगवतील असा त्याचा विश्वास होता. राजकीय सत्ते शिवाय कृषि क्षेत्रात मूलगामी स्वरुपाच्या सुधारणा करणे कठीण आहे असे म्हणणारे कांही विचारवंत आहेत. त्यांच्या योजनेप्रमाणे वाफेच्या आणि विजेच्या साहय्याने मोठ्याप्रमाणे यंत्रे वापरुन शेती करणे अधिक फायदेचे आहे. पंरतु महात्माजींना ही योजना मान्य झाल्याचे दिसत नाही. सतत जमिनीकडुन सतत सतत पीक मिळविण्याकरीता जमिनीच्या सुपीकपणाच्या बाबतीत सोदेबाजी करण्याचे धोरण हे घात अदुरदर्शी पणाचे असल्याचे त्यांचे स्पष्ट मत होते त्यामुळे जमिनीचा कस संपुष्टात येण्याची भीती त्यांनी व्यक्ती केली होती. त्यांच्या मते भुमातेकडुन जगविणारे अन्न पाहिजे असेल तर त्यासाठी मोठ्याप्रमाणात घाम गाळण्याची गरज आहे.८

शेतकरी वर्गास भरपुर प्रमाणात अन्न मिळाले पाहिजे तो अर्धपोट ही राहुन चालणार नाही. शेतकऱ्याच्या घरच्या खर्चातील फार मोठा भाग त्यांच्याकुटूंबाच्या अन्नाकडे जाणे अगत्याचे आहे. असे त्यांनी म्हटले आहे या विषयी ते नमुद करतात.'जमिनीत राबविणाऱ्यांचे भरपुर पोट भरु द्या ताजे निर्मळ दुध,तुप आणि तेल किंवा तो मासाहारी असेल तर मासे ,अंडी, मांस मिळ द्या त्याचे पोट भरपूर भरले नाही, तो अर्धपोटी राहात असेल तर सुंदर तलम कापड्यासारख्या वस्तु देऊन त्याला काय उपयोग.' खेड्यातील शाळांत शेती हे शिक्षणाचे माध्यम व्हावे असे सुचविण्यात आले परंतु यासाठी योग्य ती साधनसामग्री नसल्याबद्दल गांधीजींनी टीका केली होती. त्यांच्या मते शाळा व महाविद्यात जे शेती विषयक शिक्षण दिले जाते, ते खेड्यांना निरुपयोगी आहे. कारण तीच्याखेड्यात परिस्थितीशी फारसा संबंध जोडलेला नाही. या बाबत गांधीजी म्हणतात विद्यार्थी आपल्या शिक्षकाबरोबर शेतात जातील आणि नांगर करताना, पेरणी करताना, पाणी देताना आणि भांगलण करताना पुष्कळ नवेनवे विषय शिकतील, त्यांना तेथे भरपूर व्यायाम मिळेल त्यामुळे कृत्रिम व्यायामाची त्यांना गरज राहणार नाही. लक्षावधी भुकेलेल्या लोकांना भूमीत त्यांच्या मुलांना याशिवाय दुसऱ्या पध्दतीनी शिकविणे त्यांना योग्य वाटत नव्हते. आणि एकदा ही अभिप्रेत पध्दती वीकारली तर नव्या आर्थिक युगाचा त्यांतुन जन्म होईल असा त्यांचा विश्वास होता. शेतकऱ्यांना जेव्हां कसलीच राजकीय सत्ता नसेल तेव्हां सवीनय कायदे भंग आणि असहकार उपयोगात आणण्याची उपाययोजना त्यांनी सुचविली होती. परंतु त्यांना राजकीय सत्ता मिळाली की, त्यांच्या दर्जात जी सुधारणा व्हावयाची ती सहाजीकच कायदे मंडळाच्या मार्गानीच होईल असे त्यांचे मत होते. तसेच शेतकऱ्यांचे हित राखण्या बाबतीत विधमंडळाने जर अपली असमर्थता स्पष्ट केली तर यावेळी शेतकऱ्यांचे सविनय कायदेभंगाचा आणि असहकाराचा सारोभोम उपायाची आमलबजावणी करण्याकडे गांधीजी शेतकऱ्यांना प्रवृत्त करतात.९

**सारांश : -**

लोकशाही शासनव्यवस्थेत शेतकरी हा राजा झाल पाहिजे असे महात्माजींची प्राणिक इच्छा होती याबाबत तयांनी पुढील उदगार काढले आहेत. लोकशाहीत शेतकरी राजा झाला पाहिजे. असा एखदा प्राणिक आणि समर्थ शेतकरी जर मला पुढे करता तर मला बरे वाटेल अशा शेतकऱ्याला इंग्रजी येणार नाही मी जवाहर लालजींना त्यांचा सेक्रेटरी व्हायला सांगेल आणि त्यांच्यातर्फे त्यांनी इतर राष्ट्रांच्या वकिलांचया भेटी घ्याव्यात आणि त्याबद्दल अभिमान बाळगावा असे मी म्हणेल शेतकरी पंतप्रधान स्वताला रहायला राजवाडा मांगणार नाही. तो मातीच्या झोपडीत राहील आणि आकाशाखाली झोपेल आणि दिवसा मोकळा वेळ मिळेल तेव्हां शेतीवर काम करेल त्याद्वारे संपूर्ण चित्र पलटुल जाईल पंचायत राज्यात आणि लोक राज्यात भारतात जास्त त्याची कदर झाली पाहिजे सन १९२० पर्यंत महात्मागांधीजींने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कांही ठिकणी आंदोलन घडवुन आणले लखनौ येथे कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळी बिहार येथील कांही प्रतिनिधींनी म. गांधीजींचे लक्ष चंपारण्यातील निळीच्या मळेवाल्याकडुन तेथील शेतकऱ्यांवर होत असलेल्या अत्याचाराबाबत वेधले. त्यानंतर १९१७ च्या एप्रिल महिन्यात चंपाराण्यातील मोतीहरी या गावातील शेतकऱ्यांची चौकशी करण्यासाठी महात्मागांधी आले परंतु मॅजिस्ट्रेटने त्यांना शांततेला धोका निर्माण होईल म्हणुन जिल्हा सोडुन जाण्याचा आदेश दिला. गांधीजींने तोहुकूम मोडला आणि त्याच बरोबर सरकाने त्यांना दिलेले कैसर-इ-हिंदचे सुवर्णपदकही सरकारला परत केले. तसेच त्यानी कायद्याचा भंग करण्याचे जाहीर केले. पण सरकारच्या आदेशानुसार खटला काढून घेतला. शिवाय त्यांना या जिल्ह्यात राहून शेतकऱ्यांची सेवा व त्यांच्या परिस्थितीचे निरीक्षण करण्याची परवानगी मिळाली. बाबुराजेंद्र प्रसाद, प्रा.कृपालानी आणि सर्व्हटस ऑफ इंडियातील डॉ. देव हे या वेळी गांधींच्या नेतृत्वाखाली कार्य करीत होते. पुढे सरकारने प्रश्नांची चौकशी करण्यासाठी एक आयोग नेमला आणि त्यात म. गांधीजींचीही नेमणुक करण्यात आली या आयोगाच्या अहवालानुसार सरकाने योग्य असा कायदा करुन शेतकऱ्यांना भोडसावणाऱ्या समस्यांची उकल योग्यरीतीने केली. शेतकऱ्यांच्या या यशस्वी आंदोलनामुळे म. गांधी यांच्याबद्दल बिहार प्रांतात आणि संपूर्ण देशात शेतकरी वर्गात फारच मोठा आदर निर्माण झाला.

**संदर्भः-**


**१.** अ.मा. सुतार - भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आणि शेतकऱ्यांचे प्रश्न
प्रकाश ऑफसेट प्रिंटर्स ८३/८४, इंडस्ट्रियल स्टेट
पहिली आवृत्ती - २००७ पृष्ठ क्र. ६०६१

२. कित्ता - पृष्ठ क्र. ६२

३. कित्ता - पृष्ठ क्र. ६२-६३

४. कित्ता - पृष्ठ क्र. ६३

५. कित्ता - पृष्ठ क्र. ६३

६. कित्ता - पृष्ठ क्र. ६३

७. कित्ता - पृष्ठ क्र. ६३-६७

८. कित्ता - पृष्ठ क्र. ६८

९. कित्ता - पृष्ठ क्र. ६८


**संदर्भ ग्रंथ :-**


१. ग्रोवर बी.एल. - आधुनिक भारताचा इतिहास

२. विकास कदम - आधुनिक भारताचा इतिहास
आरुणा प्रकाशन लातूर

३. मोरवंचीकर राशी - आधुनिक भारत
पिंपळापुरे ॲण्ड पब्लीशरस नागपूर

४. मोरवंचीकर राशी - आधुनिक भारताचा इतिहास
विद्याबुक्स औरंगपुरा औरंगाबाद

५. अशोक भौरे - आधुनिक भारताचा इतिहास.
कल्पना प्रकाश नांदेड

६. नागनाथ कोतापल्ले - शेतकऱ्यांचा आसुड
७. भांडवलकर एस.एस. - भारताचा इतिहास
८. V.B. Mahajan - Modern Indian History
९. Glover B.L. - A new Look at Modern Indian History